महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य तेलुगु साहित्य अकादमी
दूरध्वनी : ०२२ - २२६७२५३९
ई - मेल : mhsahityaacademy@gmail.com
ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, दुसरा मजला,
शहिद भगतसिंह मार्ग, मुंबई - ४०० ००१.

# पुरस्कार :-

१. **जीवन गौरव पुरस्कार:-** तेलुगु कला, संस्कृती आणि साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या या भाषेतील एका व्यक्तीस दरवर्षी त्यांच्या योगदानाबद्दल **"जीवन गौरव पुरस्कार"** प्रदान करुन गौरविण्यात येईल.
**पुरस्काराचे स्वरुप : प्रत्येकी रु १.०० लाख, मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप असेल.**

२. **साहित्य पुरस्कार :-** तेलुगु भाषा आणि साहित्याशी संबंधित चार वेगवेगळ्या वाङ्.मय प्रकारातील साहित्यिकांच्या पुस्तकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल.
**पुरस्काराचे स्वरुप : प्रत्येकी रु. ५१,०००/-, मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप असेल.**

३. **कला पुरस्कार:-** तेलुगु भाषेतील कला, लोककला इत्यादी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस दरवर्षी त्यांच्या या क्षेत्रातील योगदानाबद्दल कला पुरस्काराने गौरविण्यात येईल.
**पुरस्काराचे स्वरुप : प्रत्येकी रु.५१,०००/-, मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप असेल.**

४. **नवोदित लेखक/कवी/साहित्यिक पुरस्कार :-** तेलुगु भाषा व साहित्य क्षेत्रातील एका नवोदित लेखकास या पुरस्काराने गौरविण्यात येईल.
**पुरस्काराचे स्वरुप : प्रत्येकी रु.५१,०००/-, मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप असेल.**

५. **अनुवाद पुरस्कार :-** साहित्यिक कल्पनांची देवाणघेवाण अंतर्गत मराठीमधून तेलुगु भाषेमध्ये अनुवाद करणाऱ्या साहित्यकारांना दरवर्षी या विशेष पुरस्काराने गौरविण्यात येईल.
**पुरस्काराचे स्वरुप : प्रत्येकी रु.५१,०००/- मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप असेल.**

* * * * *